**सूची**

**भारतीय राज्य घटनेतील काही भाग**

१५. धर्म, जात, जमात, लिंग किंवा जन्माचे ठिकाण यांच्या आधारे भेदभाव करण्यास मनाई :

१.

२.

३.

४. या कलमातील किंवा कलम २९(२) या कलमातील कोणत्याही तरतूदींमुळे राज्यांना सामाजिक व शैक्षणिक हक्काच्या मागासलेल्या वर्गांसाठी किंवा अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी कोणतीही तरतूद करण्यास कोणतीही बाधा येणार नाही.

१६. सार्वजनिक सेवांमध्ये समानसंधी देण्याबाबत :

१. सर्व नागरीकांना सार्वजनिक सेवांमध्ये नोकरी किंवा सेवांमध्ये नियुक्ती मिळण्यास समानसंधी असेल.

२.

३.

४.

४ अ. या कलमातील कोणत्याही तरतुदींमुळे अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातींना शासकीय सेवेमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळाले नसल्याचे राज्य शासनाचे मत झाल्यास, अशा अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना उचित पदोन्नती व तद्नुसार सेवेत वरिष्ठतेसाठी प्रावधान करण्यास राज्य शासनास बाधा येणार नाही.

४६. अनुसूचित जाती, जमाती व इतर दुर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक हित संबंधांची उन्नती करणे – अनुसूचित जाती, जमाती व इतर दुर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक हित संबंधांच्या उन्नतीसाठी सरकार विशेष काळजी घेऊन प्रावधान करील.

३३० : अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींसाठी लोकसभेत आरक्षण :

१. लोकसभेत खालीलप्रमाणे आरक्षण होईल.

अ) अनुसूचित जातीच्या लोकांसाठी

ब) आसाममधील स्वतंत्र जिल्हे वगळून इतर ठिकाणच्या अनुसूचित जमाती

क) आसाममधील स्वतंत्र जिल्ह्यातल्या अनुसूचित जमाती

२. एखाद्या राज्यातील किंवा केंद्रशासित प्रदेशातील जनसदनातील एकूण जागा व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्यासाठीच्या आरक्षित जागा यांचे प्रमाण गुणोत्तर प्रमाण व त्या राज्यातील किंवा केंद्रशासित प्रदेशातील एकूण जनसंख्या व त्या राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांची लोकसंख्या यांचे गुणोत्तर ही दोन्ही गुणोत्तर शक्य तितकी सारखी ठेवली जातील.

३. उपरोक्त कलम (२) मध्ये काहीही असले तरीही आसामातील स्वायत्त जिल्ह्यांमधील जनसदनामधील एकूण जागा व अनुसूचित जमातीसाठी आरक्षित जागा यांचे गुणोत्तर प्रमाण व आसाममधील स्वायत्त जिल्ह्यांमधील एकूण जनसंख्या व त्या जिल्ह्यांमधील अनुसूचित जमातींची एकूण जनसंख्या याचे गुणोत्तर प्रमाण ही दोन्ही शक्यतो सारखी ठेवली जातील.

खुलासा : या कलमात व कलम क्र.३३२ मध्ये 'जनसंख्या' म्हणजे ज्या शेवटच्या जनगणनेनुसार त्या त्या संख्या जाहीर केल्या आहेत, ती संख्या. मात्र जोपर्यंत २०२६ नंतर होणाऱ्या पहिल्या जनगणनेच्या त्या त्या जनसंख्या जाहीर होत नाहीत, तोपर्यंत संदर्भ संख्या म्हणून २००१ सालच्या जनगणनेत जाहीर झालेली जनसंख्या ही आधारभूत समजली जाईल.

१. आसाममधील स्वायत्त जिल्हे वगळून इतर सर्व राज्यांच्या विधानसभांमध्ये अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमातींसाठी आरक्षण केले जाईल.

२. आसाम विधानसभेमधील आसामच्या स्वायत्त जिल्ह्यांमध्ये आरक्षण केले जाईल.

३. कलम (१) खाली एखाद्या राज्यातील विधानसभेमधील एकूण जागा व अनुसूचित जाती अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमाती यांच्या आरक्षित जागांचे गुणोत्तर प्रमाण त्या

राज्यातील एकूण जनसंख्या व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमाती यांची जनसंख्या गुणोत्तर प्रमाण ही दोन्ही गुणोत्तर प्रमाणे शक्य तितकी सारखी असतील.

३A. उपरोक्त कलमांध्ये काहीही असले तरीही जोपर्यंत घटनेच्या कलम १७० प्रमाणे २०२६ नंतरच्या पहिल्या जनगणनेनुसार समायोजन होत नाही, तोपर्यंत अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम, नागालँड या राज्यांच्या विधानसभांमध्ये आरक्षित जागांची संख्या अशी असेल :

अ. जर घटनेचा (४७वी दुरुस्ती) कायदा १९८७ (यापुढे या कलमाला सध्या अस्तित्वात असलेली विधानसभा असे संबोधले जाईल.) अमलात येण्याच्या दिवशी सर्व जागा अनुसूचित जमातीच्या उमेदवारींनीच भरल्या असतील (म्हणजे सर्व विधानसभा सदस्य जर अनुसूचित जमातीचे असतील, तर एक सोडून सर्व जागा.

ब. अन्यथा उपरोक्त दिवशी त्या त्या राज्यांची लोकसंख्या व त्या त्या राज्यांतील अनुसूचित जमातींची लोकसंख्या यांचे जे गुणोत्तर प्रमाण असेल त्या गुणोत्तर प्रमाणात.

३B. उपरोक्त कलम (३) मध्ये काहीही असले, तरीही जोपर्यंत २०२६ नंतर होणाऱ्या पहिल्या जनगणनेनुसार समायोजन होत नाही तोपर्यंत त्रिपुरा विधानसभेतील अनुसूचित जमातींसाठी आरक्षण केलेल्या जागा या घटनेच्या (७७वी दुरुस्ती) कायदा १९९२ज्या दिवसापासन अमलात येईल त्या दिवशी त्या विधानसभेमधील एकूण जागा व अनुसूचित जमातींसाठी आरक्षित जागा यांचे गुणोत्तर प्रमाण असेल त्यापेक्षा कमी नसेल.

४. आसाममधील स्वायत्त जिल्ह्यांसाठी आरक्षित जागा व आसाम विधानसभेतील एकूण जागा यांचे गुणोत्तर प्रमाण हे आसामची एकूण जनसंख्या व त्या जिल्ह्यातील लोकसंख्या यांचे गुणोत्तर प्रमाणापेक्षा कमी नसेल.

५. स्वायत्त जिल्ह्यांसाठी राखून ठेवलेले मतदार संघामध्ये जिल्ह्याबाहेरचे क्षेत्र अंतर्भूत असणार नाही.

सदर स्वायत्त जिल्ह्यांमधून अशी कोणत्याही स्वायत्त जिल्ह्यांमदील अनुसूचित जमाती सदस्य नसलेली कोणतीही व्यक्ती अशा स्वायत्त जिल्ह्याच्या मतदार संघातून निवडणूक लढण्यास पात्र असणार नाही. मात्र आसाम विधानसभेच्या निवडणूकीसाठी बोडोलँड क्षेत्रातील जिल्ह्यांतील मतदार संघ म्हणून जे मतदार संघ

सूचित केले आहेत त्यातील अनुसूचित केलेल्या जमातीचे प्रतिनिधीत्व व अनुसूचित न केलेल्या जमाती व बोडोलँड क्षेत्रातील जिल्हे म्हणून सूचित करण्यापूर्वीचे या जमातीचे प्रतिनिधीत्व हे सारखेच ठेवले जाईल.